ANNEXURE P/12 61

अपिलीय प्राधिकारी व पोलीस उप आयुक्त, (प्रतिबंधक) यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेले अपील.

श्री.महमुद एम.आबदी, — अपिलकर्ता
ऐ—९०१,मीरा टॉवर्स,
मेघा मॉलच्या समोर,
ओशिवरा,अंधेरी (पश्चिम),
मुंबई—४०००५३.

**विरुध्द**

शासकीय माहिती अधिकारी (गुन्हे), — उत्तरवादी
सहाय्यक पोलीस आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई.

**विवेचन**

केद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये अपिलार्थी श्री.महमुद एम.आबदी, यांनी जन माहिती अधिकारी/सहाय्यक पोलीस आयुक्त,(गुन्हे) यांच्याकडे दिनांक २४.०२.२०११ रोजीचा अर्ज दिनांक २५.०२.२०११ रोजी प्राप्त झालेला आहे.

अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती, जनसंपर्क माहिती अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी माहिती नाकारल्यामुळे, त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी म्हणुन आमचे कार्यालयात दिनांक ११.०४.११ रोजी या कार्यालयास अपिल केले आहे.

अपिलार्थी यांनी दिनांक ११.०४.२०११ रोजी केलेल्या अपिलाच्या संदर्भात अनुक्रमे दिनांक २५.०४.२०११,०३.०५.२०११ सुनावणीच्या तारखा देण्यात आलेल्या होत्या. अपिलार्थी वरिल नमुद दिनांकास हजर होते. परंतु अपिलीय अधिकारी हे दिनांक १५.०४.२०११ रोजी सिक रजेवर असल्यामुळे, पुढील दिनांक १६.०५.२०११ देण्यात आला. दिनांक १६.०५.२०११ रोजी अपिलार्थी महमुद आबदी,सहाय्यक माहिती अधिकारी,(गुन्हे),पोउनि श्री.खरात,गुन्हे प्रकटीकरण शाखा,(प्रशासन),तपासी अधिकारी श्री.मयेकर,सपोनि,खंडणी विरोधी पथक सुनावणीसाठी हजर होते.

अपिलार्थी श्री.महमुद एम.आबदी यांनी दिनांक २४.०२.२०११ रोजी जन माहिती अधिकारी (गुन्हे) यांचे कडे विहित नमुद नमुन्यात अर्ज करून,नमुद प्रमाणे माहिती मागितली होती.

a. “Whether the Police Department has sent my communication to various government agencies including Income Tax.Enforcement

Directorate and Department of Revenue Intelligence,regarding the threat perceptions to Mr.Lalit Kumar Modi?

b. Inspection of the entire files (s)/documents relating to the communications sent by the Police Department to various Government Departmnet (viz.Income Tax,Enforcement Directorate and Department of Revenue of Intelligence) and take copies thereof".

माहिती अधिकारी (गुन्हे) यांनी त्यांच्या कडील जा.क्र. ४१९/माअ०५/२०११, दिनांक ०७.०३.२०११ अन्वये, अपिलार्थीना कळविले आहे की, नमुद माहिती उघड केल्याने,कोणत्याही व्यक्तीचे जीवन व शारिरीक सुरक्षितता धोक्यात येईल अथवा कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ,गुप्त स्वरूपात दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा मिळालेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती,माहितीचा अधिकार कायदा २००५ मधील कलम ८(१)(छ) अन्वये नाकारलेली आहे.

अपिलार्थी यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, मी ललीत मोदी यांच्या संदर्भात सरकारी व विविध कार्यालयास पोलीस खात्यामार्फत पत्रव्यवहार करण्यात आलेला का? व कागदपत्राची तपासणी करण्यासाठी इ.बाबत माहिती विचारलेली होती. मुद्दा क्र.१ ची माहिती मिळाली परंतु मुद्दा नं.२ बाबत माहिती नाकारण्यात आलेली आहे. माहिती नाकारण्यासाठी दिलेले कारण बरोबर नाही. त्यामुळे मी अपिल केले आहे. मला कागदपत्राची तपासणी करण्यासाठी दिनांक २४.०५.२०११ रोजी दुपारी १२.०० वा. ही वेळ सोईची आहे.

निष्कर्ष:— सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सहाय्यक माहिती अधिकारी व खंडणी विरोधी पथकाचे सपोनि यांचे बरोबर चर्चा केली. अपिलार्थी यांनी केलेल्या विनंती नुसार त्यानी केलेल्या नमुद दिनांकाला कागदपत्राची तपासणी करण्यासाठी व विहित केलेल्या शासकीय शुल्कासह परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे अपिलार्थीचे समाधान झाले. त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

(बी.एन. शिरसाठ) १३/५
प्रथम अपिलीय प्राधिकारी
पोलिस उप आयुक्त,(प्रतिबंधक),
गुन्हे शाखा, गु.अ.वि.,मुंबई.
ORW M012833/11

प्रत कार्यवाहीस्तव:—सहाय्यक पोलीस आयुक्त,माहिती व जनसंपर्क अधिकारी,पोलीस आयुक्तालय,बृहन्मुंबई.